**कोपबं धिर्डी, ता. आष्टी, जि. बीड योजनेस, व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सुप्रमा १०११/(४५६/२०११)/ ल.पा.१**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ३० मे २०१५

वाचा

**१) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे जा.क्र.मकृखेविम/२०९/(७१२/२००९)/लपा३/८४३८, दि.२१/१०/२०११ चे पत्र.**

**२) वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांचे पत्र क्रं. व्ययस- २०१५/प्रक्रं११३/अर्थसं-२, दि.६ मे,२०१५**

प्रस्तावना

कोपबं धिर्डी,ता. आष्टी, जि. बीड या योजनेस दिनांक०१.०९.२०१० अन्वये रु.३५६.७४ लक्ष इतक्या रकमेस प्रथम प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत आली होती. सदर अंदाजपत्रक २००७-०८च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले होते.प्रकल्पाचे काम सुरु असतांना दरसूचीच्या दरातील वाढ, भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ, संकल्पचित्रातील बदलांमुळे व इतर कारणांमुळे (निविदा अधिक्य इ.) किंमतीत झालेल्या वाढीमुळे सन २००९-१० ची दरसुची वापरुन सुधारित अंदाजपत्रक तयार करुन रु.५२६.३५ लक्ष रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे कडून शासनास प्राप्त झाला होता व तो शासनाच्या विचाराधिन होता. सदर प्रस्तावासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय**

१) बीड जिल्ह्यातील कोपबं धिर्डी या योजनेस या योजनेस सन २००९-१० ची दरसूचीवर आधारित केलेल्या सुधारित प्राक्कलनानुसार कामाच्या अंदाजित रु . ५२६.३५ लक्ष (रुपये पाच कोटी सव्वीस लाख पस्तीस हजार फक्त )या किंमतीस व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी कामासाठीची एकूण तरतूद रु.४७९.१५ लक्ष (रुपये चार कोटी एकोणऐंशी लाख पंधरा हजार फक्त) व अनुषंगिक खर्चासाठीची एकूण तरतूद रु.४७.२१ लक्ष (सत्तेचाळीस लाख एकवीस हजार फक्त) आहे. अंदाजित किंमतीचा गोषवारा सोबत जोडलेल्या विवरणपत्रात देण्यात आला आहे.

२) व्यय अग्रक्रम समितीच्या दि.९ एप्रिल २०१५ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील " सदरचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येऊ नये.." या अटीच्या अधीन राहून सुधारित प्रशासकीय मान्यतेचा हा निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

३) या योजनेच्या कामावरील खर्च मुख्य लेखाशिर्ष मागणी आय ५ "४७०२, लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च-१९०, सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमा यांतील गुंतवणुका (१२)(०१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (मराठवाडा विभाग) (४७०२ ७६२१) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व त्याखाली मंजूर अनुदानातुन भागविण्यांत यावा.

४) हा शासन निर्णय,नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२६६/का.१४३४ दि. ३०/१०/२०१३ आणि वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ५८/व्यय १२ दि.१०/०२/२०१५ अन्वये तसेच व्यय अग्रक्रम समीतीने दि. ९ एप्रिल २०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत दिलेल्या मंजूरीनुसार व संदर्भ क्रं २ नुसार याबाबतच्या निर्गमीत केलेल्या इतिवृत्तानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

५) या योजनेस प्रदान केलेली सुधारित प्रशासकीय मान्यता अ.क्र. ९९/२०१५ वर नोंदविण्यांत आलेली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६०३१२४१०६९६२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Baburao Kshirsagar

Digitally signed by Rajendra Baburao Kshirsagar
DN: CN = Rajendra Baburao Kshirsagar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Resources Department
Date: 2015.06.03 12:41:41 +05'30'

(रा. बा. क्षीरसागर)
शासनाचे अवर सचिव

**प्रत,**

१) अंदाजित किंमतीच्या गोषवाऱ्यासह :-
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपुर.
४) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
५) मुख्य अभियंता(विप्र), जलसंपदा विभाग, पुणे.
६) आंतर वित्त सल्लागार व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) जिल्हाधिकारी बीड, बीड.
८) अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद.
९) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
१०) उपसचिव (लपा)/ अवरसचिव(लपा) /उपअभियंता(लपा-१), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) कार्यासन अर्थ १-२ (२ प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क, महासंचालक, मंत्रालय, मुंबई.

(शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र. सुप्रमा १०११/(४५६/२०११) ल.पा.१, दि. ३० मे २०१५ चे सहपत्र)

## विवरण पत्र

कोपबं धिर्डी, ता. आष्टी, जि. बीड अंदाजित किंमतीचा गोषवारा

| अ.क्र. | उपशिर्ष | किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|
| १ | अ - प्राथमिक कामे | १.४० |
| २ | ब - भू संपादन | ७.१० |
| ३ | सी - कामे | ४६८.६४ |
| ४ | के- इमारत | २.०० |
| ५ | ओ संकीर्ण | - |
| ६ | पी देखभाल | - |
| ७ | आर दळणवळण | - |
| ८ | अनुषंगिक खर्च | ४७.२० |
| | **एकूण** | **५२६.३५** |

## ठळक वैशिष्टे

१. योजनेची सिंचन क्षमता - ४४५ हेक्टर
२. नियोजित पाणी साठा - २०९१ स.घ.मी.
३. पाणी साठ्याची प्रती स.घ.मी किंमत - रु. २५१६५/-स.घ.मी.
४. लाभव्यय गुणोत्तर - १.८३